मे.इस्पात इंडस्ट्रीज लि. यांना धरमतर खाडीकिनारी मौजे वावे येथील त्यांच्या अस्तित्वातील स्वनियंत्रित जेट्टीवरुन (Captive Jetty) इतर कंपनीच्या मालाची हाताळणी (Third Party Cargo) करण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शुद्धीपत्रक क्रमांक : [illegible]टी १३०९/प्र.क्र.२१४/बंदरे-२,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक : १८ सप्टेंबर, २००९.

वाचा :- शासन निर्णय, गृह विभाग, क्रमांक जेईटी १३०९/प्र.क्र.२१४/बंदरे-२, दिनांक २९ ऑगस्ट, २००९.

शुद्धीपत्रक :-

मे.इस्पात इंडस्ट्रीज लि. यांना धरमतर खाडीकिनारी मौजे वावे येथील त्यांच्या अस्तित्वातील स्वनियंत्रित जेट्टीवरुन (Captive Jetty) इतर कंपनीच्या मालाची उदा. कोळसा, कोक, सर्व प्रकारचे कोळसा उत्पादन, बॉक्साईट, खते, सल्फर, सिमेंट, स्लॅग, साखर, स्टील कॉईल्स, प्लेटस् व संबंधित उत्पादने, टाईल्स, अमोनिअम नायट्रेट, डि.ए.पी., एम.ओ.पी., डोलोमाईट, क्लिंकर, लाईमस्टोन, अन्नधान्य, डाळी, मिलस्केल इत्यादींची ३ वर्षासाठी हाताळणी (Third Party Cargo) करण्याकरीता काही अटींच्या अधीन राहून शासन निर्णय, गृह विभाग, दिनांक २९ ऑगस्ट, २००९ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. आता मे.इस्पात इंडस्ट्रीज लि. यांनी दिनांक ११ सप्टेंबर, २००९ रोजी केलेल्या विनंतीस अनुलक्षून सदर शासन निर्णयातील परिच्छेद १(ब), परिच्छेद ३ व परिच्छेद ४ मधील **"यांच्या मे. गितापुरम पोर्टस् सर्व्हिसेस लि."** हा उल्लेख वगळण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अ. धों. गांगुर्डे)
कार्यासन अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन.

प्रति,

(१) मा.मंत्री (बंदरे) यांचे खाजगी सचिव,
(२) मा.राज्यमंत्री (बंदरे) यांचे खाजगी सचिव,
(३) प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
(४) अप्पर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई,

(५) अप्पर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,

(६) सचिव (बंदरे), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,

(७) प्रधान सचिव (उद्योग), उद्योग, ऊ[illegible] कामगार, मंत्रालय, मुंबई,

(८) प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,

(९) प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई,

(१०) सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई,

(११) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई,

(१२) विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, नवी मुंबई,

(१३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई,

(१४) जिल्हाधिकारी, मुंबई शहर / मुंबई उपनगर / ठाणे / रायगड / रत्नागिरी / सिंधुदूर्ग,

(१५) व्यवस्थापकीय संचालक, मे. इस्पात इंडस्ट्रीज लि., निर्मल, ७ वा माळा, नरीमन पॉईंट, मुंबई-२१,

(१६) निवडनस्ती, कार्यासन बंदरे-१